**BDC LIBRARY**

**New Paper Clipping**

**A.Y. 2023-2024**

# देसाई कॉलेजला नॅक पिअर टीम देणार भेट

**पाटण : पुढारी वृत्तसेवा**

येथील बाळासाहेब देसाई कॉलेज ला नॅक बैंगलोर या संस्थेकडून मूल्यांकन करण्यासाठी १५ जून व १६ जून २०२३ रोजी भेट देणार असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार व डॉ. पी. वाय. फडणीस यांनी दिली. नॅक बंगलोर ही महाविद्यालयाचे मूल्यांकन करणारी राष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाची संस्था असून दर पाच वर्षांनी या संस्थेकडून महाविद्यालयाची गुणवत्ता तपासणीचे काम पाहिले जाते. मूल्यांकनादरम्यान महाविद्यालयातील आजी-माजी विद्यार्थ्यांचा अभिप्राय जाणून घेणार आहेत. टीम मध्ये चेअरमन म्हणून डॉ. सैद अखिल अहमद, समन्वयक म्हणून डॉ. गुलाम मोहमद भट तर सदस्य म्हणून डॉ. गणेशराम सेथूरमण काम पाहणार आहेत.